॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**प्रवेश पात्रता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश/ ५६ /२०२५ — दि.०७.०७.२०२५

**परिपत्रक क्र. ४० / २०२५**

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी,
संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे,
प्राचार्य यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S.) च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत.

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये किंवा त्यापुर्वी पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S.) चे जे विद्यार्थी व्दितीय वर्षात काही कारणास्तव प्रवेशीत होऊ शकले नाही अशा विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश मिळण्यासाठी महाविद्यालयांना विनंती केली आहे.त्या अनुषंगाने महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिलेले पत्र हे अधिष्ठाता मंडळाच्या सभेत विचारविनिमय करण्यासाठी ठेवण्यात आले असता, त्या पत्रांच्या अधिन राहून अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेऊन अधिष्ठाता मंडळ खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

**शिफारस :** विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्षामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ( NEP २०२०) नुसार नव्याने प्रवेश द्यावेत.

किंवा

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ किंवा त्यापुर्वी Choice Based Credit System ( पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती ) पॅटर्नचे जे विद्यार्थी काही कारणास्तव व्दितीय वर्षात प्रवेशीत होऊ शकले नाही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संबंधित महाविद्यालयांनी तासिका आणि प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याच्या अटीवर व्दितीय वर्षात Choice Based Credit System ( पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती ) अभ्यासक्रमाला प्रवेश द्यावेत, असे प्रवेश घेतलेले विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तृतीय वर्षाच्या Choice Based Credit System (पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती ) प्रवेशासाठी संबंधित महाविद्यालयांनी तासिका आणि प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याच्या अटीवर पात्र असतील.मात्र ही शैक्षणिक सवलत फक्त ( कला, वाणिज्य व विज्ञान पदवी ) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये व्दितीय वर्षासाठी आणि शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तृतीय वर्षाकरीताच लागू राहील.

तेव्हा, उपरोक्त बाब महाविद्यालयांतील विद्यार्थी / विद्यार्थ्यांनीसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

आपला विश्वासू,

( डॉ.विनोद प्र.पाटील )
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी**

१.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
३) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगांव.
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
५) मा.उपकुलसचिव, संलग्नता विभाग कबचौउमवि, जळगांव.६) समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि,जळगांव.